नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:२५/०६/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.१४

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.०२/०७/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र.३४८
मा. ॲड. अब्दुल गफुर अहंमद पठाण यांचे दि.०४/०६/२०२६ चे पत्र.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत, महान महापराक्रमी, छत्रपती श्री शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांचे भव्यदिव्य शिल्प शिवनेरी किल्ल्यावर उभारण्यासाठी स्थायी समिती व मुख्य सभेने सन २०२१ मध्ये मान्यता दिलेली आहे. या अनुषंगाने स्थायी समिती ठराव क्र ६२९ दिनांक १९/०७/२०२१ व महापालिका मुख्य सभा ठराव क्र ४२३ दिनांक २२/०९/२०२१ अन्वये रु ०२ कोटी इतकी तरतुद भव्य शिल्प उभारण्यासाठी मंजुर करण्यात आली होती. पंरतु काही कारणास्तव कोणत्याच प्रकारची कार्यवाही याबाबत भवन विभागाकडुन करण्यात आलेली नाही. तसेच आज पर्यंत या कामी तरतुद उपलब्ध नसल्यामुळे अद्याप या ठरावाबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. यापुर्वी मुख्य सभा ठराव क्र ६१३ दिनांक २५/१०/२०२१ रोजी वर्गीकरणाने रक्कम रुपये ०२ कोटी उपलब्ध करुन दिले होते परंतु त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

युग पुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांचे भव्य शिल्प जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्यावर उभारणे पुणे महानगरपालिकेस तसेच सर्व पुणेकरांना अभिमानास्पद कार्य आहे. या कामी अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये आर्थिक तरतुद करणे गरजेचे होते. तसेच भवन विभागाकडुन सदर कामी आवश्यक ती शासन नियमाप्रमाणे परवानगी घेणेबाबत कार्यवाही करणे गरजेचे आहे. युग पुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांचे भव्यशिल्प जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्यावर उभारणेसाठी त्वरीत रक्कम रु ०२ कोटी तरतुद उपलब्ध करणे आवश्यक आहे.

महापालिका मुख्य सभा ठराव क्र ४२३ दिनांक २२/०९/२०२१ अन्वये महाराष्ट्राचे आराध्य दैवत, युग पुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांचे भव्य शिल्प जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्यावर उभारणेसाठी रक्कम रु ०२ कोटी तरतुद उपलब्ध करुन देण्यात यावी व भवन विभागामार्फत या कामी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

विषय क्र.३४९
मा. आसिया मुजमिल शेख व सय्यद काशीफ फकरूल यांचे दि.२२/०६/२०२६ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ ब कोंढवा खुर्द मध्ये विविध ठिकाणी विकास कामे करणे करीता खालील प्रमाणे रक्कम रु. ४५. लक्ष रुपयांचे वर्गीकरण करून मिळणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेबाबत.

अ.क्र.	अर्थशिर्षक	कमी	अधिक
१.	सन २०२६-२७ अंदाजपत्रक क यादी क्र. SP, पान क्र. ४० बजेट कोड क्र. ZE16A104/SP2-2619 प्रभाग क्र. १९ ब शिवनेरी नगर परिसरात पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे	१० लाख	-
२.	सन २०२६ २७ अंदाजपत्रक क यादी क्र. SP, पान क्र. ४० बजेट कोड क्र. ZE16A104/SP2-2620 प्रभाग क्र. १९ - ब विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे	१० लाख	-
३.	सन २०२६ - २७ अंदाजपत्रक क यादी क. SP, पान क्र. ४० बजेट कोड क्र. ZE16A104/SP2-2621 प्रभाग क्र. १९ ब पारगे नगर परिसरात पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे	१० लाख	-
४.	सन २०२६- २७ अंदाजपत्रक यादी क्र. SJ, पान क्र. २५२ बजेट कोड क्र. CE22A548/SJ10-3448 प्रभाग क्र. १९ ब एन. आय. बी. एम. रोड परिसरात भवन विषयक कामे करणे	५.लाख	-
५.	सन २०२६- २७ अंदाजपत्रक यादी क. SJ, पान क्र. २५२ बजेट कोड क्र. CE22A548/SJ10-3449 प्रभाग क्र. १९ ब पारगे नगर परिसरात भवन विषयक कामे करणे	५ लाख	-
६.	सन २०२६-२७ अंदाजपत्रक यादी क्र. SJ, पान क्र. २५२ बजेट कोड क्र. CE22A548/SJ10-3450 प्रभाग क्र. १९ ब साईबाबा नगर परिसरात भवन विषयक कामे करणे नवीन सुचविलेले काम	५ लाख	-
१.	**नवीन सुचविलेले काम** प्रभाग क्र. १९ - ब मध्ये विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे .	-	२०.०० लाख
२.	प्रभाग क्र. १९ - ब विविध ठिकाणी रस्ते विषयक कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे	-	२५.०० लाख

विषय क्र.३५०

मा. अनिल (बॉबी) टिंगरे यांचे दि.२४/०६/२०२६ चे पत्र.

प्रभाग क्र. 1 ड मधील विविध विकासकामांकरिता र.रु. 5 लाख रुपयांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करणे बाबत.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
प्र.क्र. 1 ड कचरा गोळा करण्याकरिता घंटागाडी खरेदी करणे	५ लाख	-

(बजेट कोड - FE17A277/SY1-303)		
नवीन सुचविलेले काम 1) प्रभाग क्र. 1 ड मध्ये विविध विकासकामे करणे	-	 ५ लाख

(मा. मुख्य सभा मान्यता देईल त्या भरवशावर मा. आयुक्तांनी कारवाई करावी)

विषय क्र.३५१

मा. अनिल (बॉबी) टिंगरे यांचे दि.२४/०६/२०२६ चे पत्र.

प्रभाग क्र. 1 ड मधील विविध विकासकामांकरिता र.रु. 50 लाख रुपयांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेबाबत.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
प्रभाग क्र. 1 ड धानोरी स.नं. 38/1 येथील आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी निवासी शिक्षण केंद्र उभारणे (बजेट कोड - CE22A548/SJ10-3157)	५० लाख	-
नवीन सुचविलेले काम 1) प्रभाग क्र. 1 ड मधील धानोरी परिसरात दिशादर्शक फलक उभारणे	-	१० लाख
2) प्रभाग क्र. 1 ड मध्ये विविध ठिकाणी दिशादर्शक फलक उभारणे	-	१० लाख
3) प्रभाग क्र. 1 ड मध्ये कचरा बकेट्स खरेदी करणे	-	१० लाख
4) प्रभाग क्र. 1 ड मध्ये पाणी टँकर पुरविणे	-	१० लाख
5) प्रभाग क्र. 1 ड मध्ये नागरिकांना बसण्याकरिता लोखंडी बेचेंस बसविणे.	-	१० लाख

(मा. मुख्य सभा मान्यता देईल त्या भरवशावर मा. आयुक्तांनी कारवाई करावी)

विषय क्र.३५२

मा. सुरेखा चंद्रकांत कवडे व प्रतिक प्रकाश कदम यांचे दि.२४/०६/२०२६ चे पत्र.

प्रभाग क्र. १४ क मध्ये खालील विविध विकास कामे करण्यासाठी र.रु.४ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेबाबत.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०२५-२६ चे अंदाजपत्रक.प्र.क्र. १४ क प्रभागामध्ये विविध विकास कामे करणे. (CE22A548/SJ10-3807)	४ कोटी	-
नविन सुचविलेले काम :-		
१) प्रभाग क्रमांक १४ क मध्ये बर्निंग घाट परिसरात ड्रेनेज लाईन बदलणे व दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
२) प्रभाग क्रमांक १४ क मध्ये संत गाडगे महाराज वसाहत परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे.	-	२५ लाख

३) प्रभाग क्रमांक १४ क मध्ये जय अंबिका मित्र मंडळ परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
४) प्रभाग क्रमांक १४ क मध्ये राजीव गांधी वसाहत परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
५) प्रभाग क्रमांक १४ क मध्ये विविध विकास कामे किरकोळ मंजुरामार्फात करून घेणे.	-	२० लाख
६) प्रभाग क्रमांक १४ क मध्ये कोरेगाव पार्क भागातील तेलंगूवस्ती मध्ये ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
७) प्रभाग क्रमांक १४ क मध्ये विविध ठिकणी रस्ते डांबरीकरण व दुरुस्ती करणे.	-	२० लाख
८) प्रभाग क्रमांक १४ क मधील मदारीवस्ती भागात ड्रेनेज लाईन बदलणे व दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
९) प्रभाग क्रमांक १४ क मध्ये भिमनगर गल्ली क्र १३,१४,१५ ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
१०) प्रभाग क्रमांक १४ क मधील भीम नगर गल्ली क्रमांक 23 परिसरातील ड्रेनेज लाईन बदलणे दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
११) प्रभाग क्रमांक १४ क मधील पंचशील नगर परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व तदनुषंगिक कामे करणे.	-	२० लाख
१२) प्रभाग क्रमांक १४ क मधील पवारबाग परिसरातील १ ते ३ गल्ली मधील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
१३) प्रभाग क्रमांक १४ क विविध पंथावरील रस्ते डांबरीकरण व दुरुस्ती करणे.	-	२५ लाख
१४) प्रभाग क्रमांक १४ क मधील विविध ठिकाणी डांबरीकरण व तदनुषंगिक कामे करणे.	-	२० लाख
१५) प्रभाग क्रमांक १४ क मधील बालाजी नगर परिसरात ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे.	-	१० लाख
१६) प्रभाग क्रमांक १४ क मधील दरोडे माळा भागत ड्रेनेज लाईन दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे.	-	१० लाख
१७) प्रभाग क्रमांक १४ क मधील पिंगळे वस्ती मधील ड्रेनेज लाईन दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे.	-	१० लाख
१८) प्रभाग क्रमांक १४ क मधील आगवली चाळ येथे ड्रेनेज लाईन टाकणे.	-	१० लाख
१९) प्रभाग क्रमांक १४ क मधील फैईलवाली चाळ येथे ड्रेनेज लाईन टाकणे	-	१० लाख
२०) प्रभाग क्रमांक १४ क विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती करणे.	-	२० लाख

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र.३५३

दिनांक ०८/०६/२०२६ ते १४/०६/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ५५ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१८९, दि.१९/०६/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. ३५४

उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०५/२०२६ ते दि.३१/०५/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.१/१९०, दि.१९/०६/२०२६ चे पत्र.

सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र.३५५

प्रभाग क्र. १० ड बावधन खुर्द स.नं. १७ येथील प्लेस मेकिंग मध्ये उर्वरित स्थापत्य विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. ROHIT CONSTRUCTIONS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२८९१९३१/- पेक्षा १५.०१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२४५७८५२=१६ अधिक जीएसटी र.रु.४४२४१३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.८३२२९/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.४१४०/- पर्यंत अशी एकूण र.रु.२९८७६३४=१६ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांच्याशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/भवन/१९६, दि.२४/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र.३५६

पर्वती मतदार संघातील पवार बंगला ते जोशी यांचा बंगला आनंद विहार सिंहगड रोड परिसरातील कॉन्क्रीटिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ०४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHIVANSH INFRA यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३९३१७८४/- पेक्षा २४.५४% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९६६९२४=२१ अधिक जीएसटी र.रु.५३४०४६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४५३९८/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.१४२५०५/- पर्यंत अशी एकूण र.रु.३६८८८७३=२१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१९७, दि.२४/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र.३५७

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता विविध प्रकारची वाहने मे. जे.के. टुरिस्ट अॅण्ड ट्रान्सपोर्ट व मे.चिन्नु ट्रेव्हल्स यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (तडजोडीने) (निविदा र.रु.६,१६,०९,४८५=५० पेक्षा (+) २% ने जादा) ५०% वाढीव र.रु.३,०८,०४,७४२=७५ अधिक ५% जीएसटी र.रु.३,२९,९१,८७९=४८ पर्यंत आवश्यकतेनुसार भाडेतत्वावर घेणेस व त्याकामी त्यांचे

बरोबर टेंडर अटी शर्तीनुसार करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/१९९, दि.२५/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र.३५८

Supply, Installation and Maintenance of Relevant Sewerage and Water based Hydraulic Software for Pune Municipal Corporation (Package B4) कामी बी-२ पद्धतीने निविदा मागविली असता आलेल्या ३ निविदांपैकी निविदाधारक मे. सेइन्सिस टेक लि. यांची निविदा (टेंडर र.रु.१,४२,७१,१४९/- पेक्षा कमी) असल्याने त्यांच्याकडून र.रु. १,२०,४०,०००/- अधिक जी.एस.टी. र.रु.२१,६७,२००/- पर्यंत अशी एकूण र.रु. १,४२,०७,२००/- पर्यंत करणेस व त्यांच्याशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मलनि/२०२, दि.२५/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र.३५९

Upgradation, Supply, Installation and Maintenance of ESRI Software Products for Pune Municipal Corporation (Package B3) कामी बी-२ पद्धतीने निविदा मागविली असता आलेल्या ३ निविदांपैकी निविदाधारक मे. निओजिओइन्फो टेक्नोलॉजीज लिमिटेड यांची निविदा (टेंडर र.रु.४,४७,३५,२८८/- पेक्षा कमी) असल्याने त्यांच्याकडून र.रु. ३,७८,६३,९५०/- अधिक जी.एस.टी. र.रु.६८,१५,५११/- पर्यंत अशी एकूण र.रु. ४,४६,७९,४६१/- पर्यंत करणेस व त्यांच्याशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मलनि/२०३, दि.२५/०६/२०२६ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका